दैं. लोकमत दि. 04/03/2023

# टेम्पोत कोंबून गायींची वाहतूक; गुन्हा दाखल

## पोलिसांनी केले ७ लाखांचे वाहन जप्त



लोकमत न्यूज नेटवर्क

**तामसा :** एका टेम्पोमध्ये कोंबून ९ गोवंश जनावरे कत्तलखान्यात नेली जात असताना पोलिसांनी सापळा लावून जनावरे व टेम्पो जप्त केला. हदगाव-तामसा रस्त्यावर ३ मार्च रोजी सकाळे ६ वाजता ही कारवाई करण्यात आली.

सहायक पोलिस निरीक्षक मुंजाजी दळवी यांना या वाहतुकीसंदर्भात माहिती मिळाली होती. त्यावरून दळवी यांनी शुक्रवारी सकाळी वडगाव शिवारात सापळा लावला. तेव्हा एका वाहनातून (क्र. एमएच २६ बीई ७०३३) जनावरांची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी पोलिस कर्मचारी शहाजी जोगदंड यांच्या फिर्यादीवरून आरोपी शेख शेरू शेख दस्तगीर (रा. हस्तरा, ता. हदगाव) व खलील कुरेशी (रा. मुदखेड) या दोघांविरुद्ध तामसा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी ७ लाख रुपयांचा टेम्पो जप्त केला असून, ९ जनावरांना मुक्त केले आहे.